# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** शहर बस वाहतुकी अंतर्गत IBTM ऑपरेटर नियुक्ती अनुषंगाने मे. चलो
**{परिवहन विभाग}** मोबीलीटी यांनी दिलेल्या ऑफर दरावर दि. ०६/०२/२०२४ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांचे कक्षात चर्चा करण्यात आली. या चर्चेअंती मे. चलो मोबीलीटी चे वतीने सुधारीत दर १०२ कोटी ९० लक्ष सादर केले होते. उक्त प्राप्त दराबाबत दि. २८/०२/२०२४ ला मा. अप्पर आयुक्त यांचे कक्षात निविदा समितीची बैठक घेण्यात आली, या सभेमध्ये सखोल चर्चा व विचार विनिमय होवून निविदा समितीने मे. चलो मोबीलीटी यांनी दिलेले रु. १०२ कोटी ९० लक्ष (कर वगळुन) ची निविदा मंजुर करण्याची शिफारस मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांना केली. मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांनी दि. ०५/०३/२०२४ अन्वये सल्लागार सेवा रु. १०२ कोटी ९० लक्ष आणि वाहक पुरवठा करण्याकरीता रू. ११३ कोटी ४० लक्ष (कर वगळुन) ला मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब, मे. चलो मोबीलीटी यांना सल्लागार सेवा रु. १०२ कोटी ९० लक्ष आणि वाहक पुरवठा करण्याकरीता रु. ११३ कोटी ४० लक्ष (कर वगळुन) या दरावर IBTM ऑपरेटर म्हणून पुढील ०५ वर्षाकरीता निविदा स्विकृत करण्याचा तसेच मनपा सभागृहासमोर मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 58/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 11/03/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शहर बस वाहतुकी अंतर्गत IBTM ऑपरेटर नियुक्ती अनुषंगाने मे. चलो मोबीलीटी यांनी दिलेल्या ऑफर दरावर दि. ०६/०२/२०२४ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांचे कक्षात चर्चा करण्यात आली. या चर्चेअंती मे. चलो मोबीलीटी चे वतीने सुधारीत दर १०२ कोटी ९० लक्ष सादर केले होते. उक्त प्राप्त दराबाबत दि. २८/०२/२०२४ ला मा. अप्पर आयुक्त यांचे कक्षात निविदा समितीची बैठक घेण्यात आली, या सभेमध्ये सखोल चर्चा व विचार विनिमय होवून निविदा समितीने मे. चलो मोबीलीटी यांनी दिलेले रु. १०२ कोटी ९० लक्ष (कर वगळुन) ची निविदा मंजुर करण्याची शिफारस मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांना केली. मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांनी दि. ०५/०३/२०२४ अन्वये सल्लागार सेवा रु. १०२ कोटी ९० लक्ष आणि वाहक पुरवठा करण्याकरीता रू. ११३ कोटी ४० लक्ष (कर वगळुन) ला मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब, मे. चलो मोबीलीटी यांना सल्लागार सेवा रु. १०२ कोटी ९० लक्ष आणि वाहक पुरवठा करण्याकरीता रु. ११३ कोटी ४० लक्ष (कर वगळुन) या दरावर IBTM ऑपरेटर म्हणून पुढील ०५ वर्षाकरीता निविदा स्विकृत करण्याचा तसेच मनपा सभागृहासमोर मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.